Title of Programme: **‘पुस्तक भेट’ उपक्रम**

Name of Organizing Department : **मराठी विभाग**

Name of the Coordinator of the Programme: **डॉ. संजय शिंदे**

Date of the Programme : ११/८/२०२६

Venue: **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

Target Group : **प्रथम वर्ष कला शाखा विद्यार्थी**

Number of Participants: ६५

Name of Resource Person : **संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील साहेब**

Total Expenditure for the Programme: - १०००० /-

Source of Funding: - **डॉ. संजय शिंदे**

**Report: ‘पुस्तक भेट’ उपक्रमाचा अहवाल**

दि. ११/८/२०२६ रोजी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचनसंस्कृतीचा प्रचार व प्रसार व्हावा आणि वाचनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडून यावा, या उद्देशाने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने ‘पुस्तक भेट’ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत विश्वास नांगरे पाटील यांच्या ‘मन में है विश्वास’ या आत्मकथनाच्या सुमारे ५० प्रती विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी सकस व समृद्ध वाचनाने माणसाचा सर्वांगीण विकास होतो, असे सांगितले. आयुष्याच्या विविध टप्प्यांवर पुस्तके मार्गदर्शकाची भूमिका बजावतात. पुस्तक वाचनामुळे एकाग्रता वाढते, स्मरणशक्ती व कल्पनाशक्ती विकसित होते. श्रवण, संभाषण, वाचन आणि लेखन ही भाषिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी वाचन हा सर्वोत्तम पर्याय आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. ‘मन में है विश्वास’ या आत्मकथनातून विद्यार्थ्यांना संकटांशी लढण्याचे बळ आणि प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या पुस्तकातून बोध घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्नशील राहावे आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी गांभीर्याने वाचन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी विद्यार्थिनी दिक्षा जाधव आणि विद्यार्थी संस्कार वायकर यांनी मनोगते व्यक्त करून या उपक्रमाबद्दल आपल्या भावना मांडल्या. विद्यार्थ्यांना पुस्तक भेट देण्यात आल्यामुळे त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यास तसेच प्रेरणादायी साहित्याशी त्यांचा परिचय होण्यास निश्चितच मदत झाली. कार्यक्रमास डॉ. योगेश वाळुंज, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, डॉ. श्वेतांबरी मांडे, डॉ. सागर थेऊरकर, प्रा. वैभवी कोपर्डे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले. विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या माध्यमातून प्रेरणा देणारा आणि वाचनसंस्कृतीला चालना देणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे.

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.



विद्यार्थ्यांना पुस्तक भेट देताना मान्यवर



विद्यार्थ्यांना पुस्तक भेट देताना मान्यवर

लोकमत

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वाचन आवश्यक : अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**राजगुरुनगर :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वाचन हे एक महत्त्वपूर्ण साधन आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वाचनसंस्कृतीच्या प्रचारासाठी आयोजित 'पुस्तक भेट' उपक्रमात बोलत होते. यावेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, डॉ. श्वेतांबरी मांडे आणि डॉ. सागर थेऊरकर उपस्थित होते.



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचनसंस्कृतीच्या प्रचार आणि प्रसारासाठी कार्यक्रम आयोजित.

अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, जीवनातील विविध टप्प्यांवर पुस्तके मार्गदर्शक ठरतात. वाचनाने एकाग्रता वाढते, स्मरणशक्ती व कल्पनाशक्ती विकसित होते. भाषिक कौशल्यांच्या आत्मसातीकरणासाठी वाचन हा सर्वोत्तम पर्याय आहे. "मन में है विश्वास" या आत्मकथनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संकटकाळात प्रेरणा मिळेल आणि ते आपापल्या जीवनाला अर्थ प्राप्त करू शकतील, असे त्यांनी आवाहन केले. याप्रसंगी दीक्षा जाधव आणि संस्कार वायकर विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांच्या पुढाकाराने ५० विद्यार्थ्यांना "मन में है विश्वास" या पुस्तकाच्या प्रती देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 5 Aug 13, 2026
Powered by: erelego.com